# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 03/01/2020 (शुक्रवार)
# (सकाळ)

---

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 18 कि.मी. अंतरावरील मौजा सालई फाटा येथे दिनांक 01/01/2020 चे 17:00 वा. ते दिनांक 02/01/2020 चे 14:00 वा. दरम्यान आरोपी नामे– गणेश लाडे, रा. खापा, नरसळा हा स्वतः च्या नवीन मोटरसायकल वर पुरण शेरकु आके, वय 60 वर्ष, यांना बसवुन घेउन जात होता. दरम्यान गणेश लाडे याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने चालविल्याने सालई फाटयाजवळ मोटारसायकल स्लिप झाली. या अपघातात पुरण आके हे गंभीर जखमी होवून त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. राठोड हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर सरकारी दवाखाना जवळ पारशिवनी येथे दिनांक 02/01/2020 चे 17:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– निखील बळवंतराव फटींग, वय 32 वर्ष, रा. दरोडा, ता. हिंगणघाट, जि. वर्धा, हमु. पालीवार वार्ड क्र. 6, सोनार मोहल्ला, पारशिवनी यांची एमएच–32/एच–4115 क्रमांकाची सिल्वर रंगाची पॅशन प्लस मोटरसायकल किंमती 10,000/– रू. चा मुद्येमाल अज्ञात आरोपीने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार दिलीप बासोडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर